
Peer reviewed Journal    Impact Factor: 7.265    ISSN-2230-9578

# Journal of Research and Development







*A Multidisciplinary International Level Referred Journal*

*January 2022    Volume-13    Issue-2*

**Chief Editor**

***Dr. R. V. Bhole***

*'Ravichandram' Survey No-101/1, Plot No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.)*



**Address**

'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23, Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

# Journal of Research and Development

*A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal*

*January-2022 Volume-13 Issue-2*

**Chief Editor**
Dr. R. V. Bhole
'Ravichandram' Survey No-101/1, Plot, No-23,
Mundada Nagar, Jalgaon (M.S.) 425102

**EDITORIAL BOARD**

| | | |
|---|---|---|
| *Nguyen Kim Anh* [Hanoi] Virtnam | *Prof. Andrew Cherepanow* Detroit, Michigan [USA] | *Prof. S. N. Bharambe* Jalgaon[M.S] |
| *Dr. R. K. Narkhede* Nanded [M.S] | *Prof. B. P. Mishra,* Aizawal [Mizoram] | *Prin. L. N. Varma* Raipur [C. G.] |
| *Dr. C. V. Rajeshwari* Pottikona [ AP] | *Prof. R. J. Varma* Bhavnagar [Guj] | *Dr. D. D. Sharma* Shimla [H.P.] |
| *Dr. Abhinandan Nagraj* Benglore[Karanataka] | *Dr. Venu Trivedi* Indore[M.P.] | *Dr. Chitra Ramanan* Navi ,Mumbai[M.S] |
| *Dr. S. T. Bhukan* Khiroda[M.S] | *Prin. A. S. Kolhe Bhalod* [M.S] | *Prof.Kaveri Dabholkar* Bilaspur [C.G] |

**Published by-** Chief Editor, Dr. R. V. Bhole, (Maharashtra)

**The Editors shall not be responsible for originality and thought expressed in the papers. The author shall be solely held responsible for the originality and thoughts expressed in their papers.**

**© All rights reserved with the Editors**

'Journal of Research & Development'
A Multidisciplinary International Level Referred and Peer Reviewed Journal,
Impact Factor-7.265, ISSN: 2230-9578, January-2022, Volume-13, Issue-2

**CONTENTS**


| Sr. No. | Paper Title | Page No. |
|---|---|---|
| 1 | 'आना इस देश' : एक असफल प्रेम कथा<br>डॉ. विश्वनाथ महादू देशमुख | 1-5 |
| 2 | मध्यप्रदेश पाठ्यपुस्तक निगम द्वारा निर्धारित कक्षा ९ वीं की हिन्दी विषय की पाठ्यपुस्तक का विधार्थियो की प्रतिक्रियाओं के आधार पर विश्लेषण<br>अंजली सेन डॉ. शिवानी श्रीवास्तव | 6-10 |
| 3 | भारतीय समाज में प्रौढ महिलाओं की स्थिति<br>नेहा वर्मा डॉ शिवानी श्रीवास्तव | 11-14 |
| 4 | सावित्रीबाई फुले : व्यक्ति आणि वाङ्मय<br>प्रा. डॉ. वाल्मिक शंकर आढावे | 15-19 |
| 5 | सार्क देशांतर्गत सहकार्यासाठी सार्क उपग्रह<br>प्रा. डॉ. प्रतिभा सदाशिव देसाई | 20-24 |
| 6 | महिलओं के प्रति सकारात्मक दृष्टिकोण<br>डॉ. गौरी सिंह परते | 25-28 |
| 7 | लोकसाहित्याचे अध्यापनातील महत्व<br>प्रा.डॉ. संतोष सदाशिव देठे | 29-32 |
| 8 | साहित्यातून दिसणारे कृषी जीवन<br>प्रा.डॉ. लक्ष्मण गित्ते | 33-35 |
| 9 | साहित्य समाज आणि दलित साहित्य<br>प्रा.डॉ.अनिल बळीराम बांगर | 36-38 |
| 10 | ग्रामीण विकासात सिंचनाचे महत्त्व : एक अभ्यास<br>प्रा.डॉ.डी.पी. जावळे | 39-40 |
| 11 | छत्रपती शिवाजी महाराजांचे जलव्यवस्थापन:एक अभ्यास<br>प्रा. शिंदे आत्माराम हानवतराव | 41-43 |
| 12 | संपोषणीय कृषिः उद्देश्य, लाभ एंव सुझाव (गोरखपुर जिले के विशेष संन्दर्भ में)<br>अमर नाथ सिंह डॉ कमलिनी श्रीवास्तव | 44-45 |
| 13 | गोंदिया जिल्हयातील व्यायसायिक संरचना २००१ ते २०११<br>डॉ.मनिषा कृ. देशपांडे | 46-54 |
| 14 | छत्तीसगढ़ में अनुसूचित जनजाति जनसंख्या का वितरण प्रतिरूप<br>डॉ. आर. एन. यादव डॉ. साधना सोम | 55-60 |
| 15 | दापोली तालुक्यातील आंबा प्रक्रिया उद्योगात काम करणा-या स्त्री मजुरांचा टिकात्मक अभ्यास<br>डॉ दिलीप शंकरराव पाटील, अजय रामचंद्र लोखंडे | 61-66 |

# साहित्य समाज आणि दलित साहित्य

**प्रा.डॉ.अनिल बळीराम बांगर**

मराठी विभाग प्रमुख को.ए.सो.लक्ष्मी-शालिनी महिला महाविद्यालय,पेझारी, ता.-अलिबाग,जि.-रायगड

**प्रास्ताविक:** मराठी साहित्यात पुन्हा एकदा साहित्य आणि समाजाचा अन्योन्य असा प्रवाही संबंध दलित साहित्याच्या रूपाने प्रगट झाला आहे. विद्रोह आणि विज्ञान ही मूल्ये स्वीकारून वाट चालणारे दलित साहित्य, साहित्य आणि समाज यांचा अपरिहार्य संबंध प्रगट करते. आजवरचे मराठी साहित्य हे बहुतांशी पांढरपेशा वर्गातील लेखकांनी निर्माण केले आहे. डॉ.केतकरांनी साहित्याच्या संदर्भात वापरलेली, "सदाशिव पेठी" साहित्य ही संज्ञा अद्यापही सार्थ आहे. ती एक प्रवृत्ती असून; ती सामाजिक जीवनाच्या प्रचलित व्यवस्थेतून निर्माण झाली आहे. जातिभेदाच्या तटबंदीने एकूण समाज जीवनाचे विविध स्वायत्त प्रांत निर्माण करून या प्रवृत्तीला मोठा हातभार लावला आहे. साहित्य आणि शिक्षण क्षेत्रातील आजवर चालत आलेल्या उच्चवर्णीयांच्या वर्चस्वाखाली बहुजन व पददलितातून शिकून शहाणे होऊन पुढे आलेल्या नव्या पिढीतील तरुणांच्या आगमनाने तडे जाऊ लागले; तसेच जातिभेदाच्या तटबंदीला समतावादी विचारसरणीचे हादरे बसू लागले. आजवर पांढरपेशा वर्गातील साहित्यिकांनी साहित्यात जो तोच तोचपणा आणला होता; त्यालाही तळागाळातील शिक्षणाने जागृत झालेल्या तरुण-पिढीने जबरदस्त धक्के द्यायला सुरवात केली. आजपर्यंत मराठी साहित्याला अपरिचित असलेले पद-दलितांचे विश्व साहित्यात साकार होऊ लागल्यावर साहित्याला विस्तीर्ण स्वरूप प्राप्त झाले, यात शंका नाही. विख्यात कथाकार बाबुराव बागुल दलित साहित्याच्या संदर्भात म्हणतात, "दलित म्हणजे वर्णव्यवस्थेला आणि तिच्या समग्र वैचारिक व्यवस्थेला उध्वस्त करू बघणारा दलित, हे जग व जीवन नव्याने मांडू बघणारा, दलित म्हणजे या युगाने ज्याचे हात प्रज्ञावंत, प्रलयंकारी केलेले आहेत आणि ज्यांच्यासाठी आधुनिक शस्त्रे आणि शास्त्रे उपलब्ध करून दिलेली आहेत. या आपल्या दलितांच्या व्याख्येत अमेरिकेतील काळा, गोरा, तांबडा, अफ्रिकन – आशियाई देशातील काळा, गोरा, पिवळा आपल्या देशातील अस्पृश्य, आदिवासी, शोषित, पिडीत येतात." सुप्रसिध्द कवी व समीक्षक प्रा. केशव मेश्राम तर म्हणतात, "हजारो वर्ष ज्याच्यावर अन्याय झाला, अशा अस्पृश्यांनी लिहिलेल्या साहित्याला दलित साहित्य म्हणावे."

दोन्ही दलित साहित्यिकांनी मांडलेल्या विचारांचा मागोवा घेताना स्पष्ट होते ते असे – बाबुराव बागुलांनी दलितांचा अर्थ अत्यंत व्यापक दृष्टीकोनातून मांडलेला आहे. त्यांत त्यांनी आफिकन निग्रो, अमेरिकेतील काळया वर्णाच्या व आशियाई देशातील बऱ्याच शोषित, पिडीत लोकांचा समावेश केलेला आहे. केवळ अस्पृश्य म्हणजे दलित, केवळ माणुसकी हिरावला गेलेला, पशूपातळीवर जीवन जगणारा म्हणजे दलित अशी संकुचित कल्पना बागुलांची नाही. तर प्रा. केशव मेश्राम दलित साहित्य म्हणजे केवळ अस्पृश्यांनी, दलितांनी लिहिलेले साहित्य म्हणजे दलित साहित्य अशी संकुचित स्वरुपाची व्याख्या करतात. पण आजचे दलित साहित्य हे फार व्यापक रूप धारण करून आहे. ज्यांना दलित जाणीव आहे, असेही दलित साहित्य निर्माण करू शकतात व त्यालाही दलित साहित्य म्हटले जाते. अशाच स्वरुपाची परंतु व्यापक अर्थाने केलेली शरदचंद्र मुक्तिबोध यांची व्याख्या आहे."दलित वाङ्मय म्हणजे दलितोद्धाराचे वाङ्मय नव्हे. माटयांचे वाङ्मय किंवा खांडेकरांच्या 'दोन मने' ह्या कादंबरीचा नायकही दलितच आहे. ह्यात लेखक वरिष्ठ वर्गाचा असून तो कनिष्ठ वर्गाकडे अनुकंपेच्या दृष्टीने पाहतो. हे दलित वाङ्मय नव्हे. दलित असणे व दलित जाणीव असणे हे भिन्न आहे. दलित जाणिवेतून दलित जीवनविषयक जे वाङ्मय निर्माण होते ते दलित वाङ्मय." थोर साहित्यिक नरहर कुरुंदकर यांनी दलित साहित्याबद्दल मांडलेले विचार पुढीलप्रमाणे – " दलित साहित्य ही मी केवळ वाङ्मयीन चळवळ समजत नाही. तर ती एक जीवनसृष्टी आहे. असे मी मानतो. प्रत्येक मानवाला स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि भीतीशून्य सुरक्षितता मिळाली पाहिजे अशा भूमिकेवरून निर्माण झालेली एक जीवनसृष्टी वाङ्मयात अभिव्यक्त होत आहे. त्याला मी दलित साहित्य मानतो." कुरुंदकरांना दलित साहित्य ही एक जीवनदृष्टी वाटते. ही जीवनदृष्टी म्हणजे स्वातंत्र्य, प्रतिष्ठा आणि सुरक्षितता मिळावी त्या हेतूने साहित्यात अभिव्यक्त झालेले जीवनदर्शन होय. प्रा. शरदचंद्र मुक्तीबोधांना मात्र दलित असो अथवा दलितेतर असो लेखक कुणीही असो पण त्याला दलित जाणीव असणे आवश्यक वाटते; केवळ दलित लेखक

असेल आणि जर दलित जाणीव नसेल तर ते दलित साहित्य होऊच शकणार नाही असे ते म्हणतात. आजचे दलित साहित्य डॉ. आंबेडकरांच्या तत्वज्ञानातून जन्माला आले आहे असे म्हणत असताना स्वातंत्र्योत्तर काळातील ही एक महत्वाची वाङ्मयीन उपलब्धी होय हे लक्षात घ्यावे लागते. तसे पहिले तर दलित लेखनाची परंपरा तेराव्या शतकापासून आहे. संत चोखामेळा आणि त्याचे संत घराणे यांची भक्तिरचना ही एक प्रकारे त्यांच्या मनाचे आक्रंदनच होय, परतू अन्याय, अत्याचार आणि छळ सहन करीत चोखामेळयाने आपली जीवनयात्रा संपवली. आपले दुःख म्हणजे आपल्या नशिबाचा लेख होय, अशीच त्याची धारणा होती. त्यामुळे कर्मविपाकाच्या पाशातून चोखामेळा कधीही मुक्त होऊ शकला नाही."तुझिया दरीचा कुतरा नको मोकलू दातारा" अशी आर्त हाक चोख्याने मारली ती कोणत्या अर्थाने ? तो अन्याय, अत्याचार व छळ याविरुद्धची तक्रार नव्हती. विसाव्या शतकात मात्र डॉ. बाबासाहेबांच्या विचारांनी आणि तत्वज्ञानाने दलितांचे एक नवे जग निर्माण झाले. त्यांच्यात स्वाभिमान आणि आत्मसन्मान निर्माण झाला. आणि याच प्रेरणेतून दलित साहित्य जन्माला आले. दलित लेखकांनी विषमतावादी समाजव्यवस्था नाकारली; आणि मानवी प्रतिष्ठेचा पुरस्कार केला. आंबेडकरी प्रेरणेने जागून उठलेल्या दलित लेखकांनी पुराणप्रियता, ईश्वरीय अधिसत्ता, अन्याय, अत्याचार, सामाजिक विषमता नाकारली. आणि आपल्या लेखनातून समतावाद, मानवी प्रतिष्ठा, मानवी स्वातंत्र्य आणि वैज्ञानिकतेचा पुरस्कार केला. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी म्हटले होते – "आज समाजजीवन व राष्ट्रजीवन प्रगत होणारे साहित्यशास्त्र निर्माण होत नाही. आपल्या स्वतंत्र देशाला एकात्मतेची बंधुत्वाची नितांत गरज आहे. एकात्मता आणि बंधुता हा आपल्या राष्ट्राचा गाभा ठरला पाहिजे. त्याशिवाय प्रबळ संघशक्ती निर्माण होणार नाही. म्हणून साहित्य कलेतूनही मानवतावादी शास्त्र निर्माण होण अत्यावश्यक आहे. त्यासाठी साहित्य क्षेत्रात राष्ट्रोपयोगी क्रांतीची लाट उसळली पाहिजे. अलीकडे तर साहित्याच्या कडा काळवंडत चाललेल्या आढळतात. पीक फार आहे. पण ते निसत्व आहे. आज आम्हाला ज्ञानसत्वाची भूक आहे. तेंव्हा तत्परतेने सावध होऊन जीवन व संस्कृतीविषयक मूल्ये साहित्यिकांनी जोपासली पाहिजे. ती सतेज बनविली पाहिजे. म्हणून मला साहित्यकारांना आवर्जून सांगावायचे आहे की उदात्त जीवनमूल्ये सांस्कृतिक मूल्ये आपल्या साहित्य प्रकारातून आविष्कृत करा. आपल लक्ष आंकुचित, मर्यादित ठेवू नका. ते विशाल बनवा. आपली वाणी चार भिंतीपुरती राखू नका. खेड्यातील उपेक्षित, दुःखी समाजाचं साहित्याद्वारे त्याचं जीवन उन्नत करण्यास झटा. त्यातच खरी मानवता आहे. हीच प्रेरणा घेऊन डॉ. बाबासाहेबांच्या प्रेरणेने व त्यांच्या तत्वज्ञानातून दलित लेखक, समीक्षक, विचारवंत उदयास आलेले आहेत. दलित साहित्यिकांनी आपल्या निर्मितीच्या संदर्भात जे विचार मांडले ते चिंत्य आहेत. थोर दलित साहित्यिक अण्णाभाऊ साठे यांनी काल्पनिकतेला कधीही ग्राह्य मानले नाही. जे जीवन आपण जगतो तेच साहित्यात यावे अशी त्यांची धारणा होती. आपल्या लेखनाचे प्रयोजन प्रतिपादन करताना ते म्हणतात – "जशी प्रतिभेला वास्तवाची गरज असते, तद्वतच कल्पनेला जीवनाचे पंख असणे आवश्यक असते आणि अनुभूतीला सहानुभूतीची जोड नसेल तर आपण का लिहितो याचा पत्ताच लागण शक्य नाही. म्हणून मी लिहिताना सदैव सहानुभूतीने लिहिण्याचा प्रयत्न करतो; कारण ज्यांच्या विषयी मी लिहितो, ती माझी माणसे असतात." साहित्य निर्मितीसाठी वास्तवता, जीवनानुभव आणि सामाजिक जाण या गोष्टींची नितांत गरज असते. त्याशिवाय साहित्य निर्मिती होणे अशक्य आहे, असे अण्णाभाऊ साठे यांना वाटते. आणि आतापर्यंत जो समाज उपेक्षित राहिला, आर्थिक, सांस्कृतिक व साहित्य क्षेत्रात सुध्दा; त्या आपल्या लोकांविषयी लिहीने मी माझे कर्तव्य समजतो, अशीही ते कबुली देतात. एवढेच नाही तर – "मी जीवन जगतो, अनुभवतो, पाहतो, तेच मी लिहितो. मला कल्पनांचे पंख लावून भरारी मारता येत नाही." असे स्पष्ट मत आपल्या "बरबाद्याकंजारी" च्या प्रस्तावनेत ते मांडतात. दलित लेखकाजवळ अनुभवाचा इतका विपुल साठा आहे की, त्याला कल्पनेची जोड लावण्याची गरजच भासत नाही. आणि 'वास्तवता' हे एकदा दलित साहित्यातील तत्व मान्य केल्यावर मनाला स्वैर सोडणे दलित लेखकांना परवडण्यासारखे नाही. सामाजिक जाणिवेने प्रेरित होऊन थोर समीक्षक डॉ.म.ना.वानखेडे हे दलित लेखकांना सावध करताना म्हणतात – "समाज ढवळून निघत आहे; आपल्या आतापर्यंतच्या स्थिर सिहांसनाला भुकंपाचे धक्के बसत असल्याची जाणिव झाल्यामुळे पांढरपेशी लेखक व समीक्षक कलेसाठी कला हा मंत्र अधिकच जोराने बडबडू लागला आहे. दलित लेखकांनी या सुंदर दिसणाऱ्या सायरनच्या आवाजाला भुलू नये. कला समाजासाठी नाही तर कुणासाठी आहे?" वस्तुस्थितींचे भान असलेले डॉ.म.ना.वानखेडे संपूर्ण दलित लेखकांना जागृत करीत आहेत. आव्हान देत आहेत. ते स्पष्ट विचारतात; कला समाजासाठी नाही तर कुणासाठी असते ?

दलित लेखक जर या वादाला भुलून बळी पडायला लागला तर दलित साहित्याला जी एक दिशा आहे. तिला एक खास प्रेरणा लाभली आहे. त्याचे काय होणार ? अशी एक प्रकारची भीती डॉ.म.ना.वानखेडे यांना वाटते. बाबासाहेबांनी स्वातंत्र्य, समता, बंधुता व एकात्मता या जीवन मूल्यावरच जास्त भर दिला होता. त्यांनी साहित्यिकांना एक प्रकारची मानवतावादी विचाराची दृष्टी दिली. खेड्यातील गरीब समाजाकडे, तसेच अस्पृश्य, आदिवासी जाती – जमातींचे जीवन साहित्यातून प्रगट होणे आजच्या मानवी समाजाच्या दृष्टीने किती महत्वाचे आहे हे पटवून दिले. याच डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रेरणेने प्रेरित होऊन पुढे दलित साहित्य अवतरू लागले. ही आंबेडकरी प्रेरणा दलित साहित्यिकांना जीवदान ठरली. याच दलित साहित्य प्रेरणेविषयी डॉ.पानतावणे म्हणतात – " दलित साहित्याचे प्रेरक, प्रवर्तक व जनक आज कोणीही दलित लेखक नाही, जो ज्वालामुखी झाला आणि ज्याने आत्मजागृतीसाठी सारी मने पेटवली तो डॉ.बाबासाहेब आंबेडकर नावाचा महान माणूस आणि त्यांचे महान तत्वज्ञान हेच दलित साहित्याचे आदि आणि अंती प्रेरणास्थान आहे." ज्या समाजाला वर्षानुवर्षे अस्पृश्य म्हणून गावकुसावाहेर गुलामीचे जिणे जगावे लागले. कुत्र्या-मांजरापेक्षाही हीन दर्जाचे जिणे ज्याच्या वाट्याला आले. अशा समाजाच्या मृत झालेल्या मनावर आपल्या तत्वज्ञानरूपी अमृताचे सिंचन करून ज्यांना जीवदान दिले. स्वतः ज्वालामुखी बनून पेटत राहिले, जळत राहिले; आणि दलितांना प्रकाश दिला; चैतन्य दिले. त्या महान पुरुषाची बरोबरी करणारा अजून झाला नाही व होणारही नाही असा विचार डॉ.पानतावणे व्यक्त करतात. दलित साहित्याच्या प्रेरणेविषयी विद्याधर पुंडलिक आपले विचार व्यक्त करताना म्हणतात – " दलित साहित्यामागील सामाजिक प्रेरणा अधिक जीवंत आणि खऱ्या आहेत. त्यामागे हिंदू समाज रचनेतील भयानक विषमता आणि अन्यायाबद्दलची धगधगीत भाजून काढण्याची चीड आहे." दलित साहित्य समाजाभिमुख असून वास्तव आहे, या साहित्यामधून दलितांच्या जीवनाचे हुबेहूब प्रतिबिंब उमटत असते. समाजापुढे ते एक प्रकारचा आरसा धरत असते. हे सगळ त्यांनी भोगलेल्या, अनुभवलेल्या अनुभूतीतून साकार होत असते. जातीयता, वर्णद्वेष, वर्णभेद, आर्थिक, सामाजिक, राजकीय व्यवस्थेतील विषमता, अस्पृश्यता आपल्या संस्कृतीने दिलेले दु:ख, व्यथा, वेदना, चीड, अन्याय, नकार, विरोध हे सगळे या साहित्यात येते. दलितांच्या जीवनातील सत्य घटना, प्रसंग, व्यक्ती, व्यक्तीसमुह यांचे यथार्थ दर्शन या साहित्यात घडते; दलित साहित्याचे ते आदि व प्रमुख कर्तव्य आहे. म्हणून समाज व दलित साहित्य यांचा अत्यंत निकटचा संबंध आहे हे स्पष्ट होते.

**समारोप**

दलित साहित्याच्या संदर्भात दलित साहित्याकडे पाहण्याचा दृष्टीकोन सुद्धा लक्षात घेणे आवश्यक आहे. दलितानी साहित्यीनिर्मिती करताच त्याकडे उपहासगर्भतेने पाहणारा समीक्षकाचा आणि वाचकाचा एक वर्ग निर्माण झाला. हे साहित्य सूडवाद्यांचे साहित्य आहे, सवतासुभा निर्माण करणारे साहित्य आहे, अशी टीका झाली. मराठी साहित्याच्या कक्षा रुंदावण्याचे काम दलित साहित्याने जसे केले त्याचप्रमाणे जीवनवादाच्या कक्षा रुंदावण्याचे कामही याच साहित्याने केले. पारंपारिक जीवनदृष्टी आणि साहित्यदृष्टी यास दलित साहित्याने एक प्रकारे हादरा दिला, असे म्हणता येईल. त्यामुळेच कदाचित दलित साहित्यावर टीकेचे बाण सोडण्यात आले असावेत. या टीकेचा अनेक दलित समीक्षकांनी समाचार घेतला आहे.आज दलित साहित्याचा काही समीक्षक उपहासाने निर्देश करीत असले तरी दलित साहित्यातील वाङ्मयीन गुणवत्ता नाकारता येत नाही. दलित कविता, कथा, नाटक, आत्मकथन आणि वैचारिक लेखन या दृष्टीने लक्षात घ्यावे लागेल.

**संदर्भग्रंथ सूची :**

१) दलित साहित्य वेदना आणि विद्रोह – भालचंद्र फडके
२) भारतीय दलित साहित्य – शरणकुमार लिंबाळे
३) साहित्याचा अन्वयार्थ – नागनाथ कोत्तापल्ले
४) शतकातील दलित साहित्य - शरणकुमार लिंबाळे
५) समग्र लेखक – बाबुराव बागूल (संपादक – डॉ.कृष्णा किरवले
६) समाज आणि साहित्य – डॉ.सदा.कऱ्हाडे
७) साहित्य आणि समाजजीवन – वि.स.खांडेकर
८) मराठी साहित्यातील स्पंदने – गो.म.कुलकर्णी
९) प्रतिभा साधन – प्रा.ना.सी.फडके
१०) रुपवेध – नरहर कुरुंदकर